श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-८, अंक-शिवजयंती विशेषांक | नोव्हेंबर-२०२० | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १६ |

## श्रीशिवजयंती सोहळा, शिवसमर्थगड, श्रीक्षेत्र डेरवण

शिवसमर्थगड, श्रीक्षेत्र डेरवण येथे प्रतिवर्षाप्रमाणेच; श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा, श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांनी प्रवर्तित केलेला शिवजयंती उत्सव अत्यंत उल्हासपूर्ण वातावरणात साजरा झाला. फाल्गुन वद्य ३, शक १९४१; गुरुवार, दि. १२ मार्च २०२० रोजी सकाळी ठीक ९.०० वाजता ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण आणि ध्वजगीत गायनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. सभास्थानी वे.मू. मंदार फडकेगुरुजी, वे.मू. मिलिंद बोरकरगुरुजी आणि वे.मू. माधव परांजपेगुरुजी यांच्यासह ब्रह्मवृंदाकडून शांतिसूक्तपठण आणि ईशस्तवन झाल्यावर सभेचे सूत्रसंचालन करताना संस्थेच्या शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी सभेचे अध्यक्ष, वक्ते, पाहुणे आणि श्रोतृवर्ग यांचे मन:पूर्वक स्वागत केले.

सभेच्या अध्यक्षस्थानी प्रा. सचिन कानिटकर हे होते. सांगलीच्या वालचंद कॉलेजची 'एम.इ.' ही पदवी प्राप्त श्री. कानिटकर हे 'मेकॅनिकल इंजिनीअरिंग' या विषयाचे प्राध्यापक म्हणून इचलकरंजी येथे कार्यरत असून लेखक, वक्ता आणि सामाजिक क्षेत्रात एक अग्रगण्य कार्यकर्ता अशी त्यांची ठळक ओळख आहे. प्रामुख्याने



*रोहिडेश्वराचे मंदिरात हिंदवी स्वराज्याची शपथ!*

ऐतिहासिक आणि अन्य विविध विषयांवर त्यांनी विपुल लेखन केलेले आहे. महाराष्ट्रभर एक ओजस्वी वक्ता अशी त्यांची ख्याती असून 'संस्कृती, नाशिक' या संस्थेने त्यांचा 'क्रांतिशाहीर' अशी पदवी देऊन गौरव केला आहे. अशाच तऱ्हेचे, त्यांच्या वक्तृत्वाचा गौरव करणारे अनेक किताब त्यांना वेगवेगळ्या संस्थांकडून मिळाले आहेत. आदर्श शिक्षक पुरस्कारानेही त्यांना अनेक वेळा गौरविण्यात आलेले आहे. श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आदी अर्पण करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रा. सौ. नीलाताई कदम यांची प्रमुख वक्त्या म्हणून ओळख करून देताना सौ. यशवंतराव म्हणाल्या की प्रा. नीला कदम यांनी शिक्षण क्षेत्रात चौतीस वर्षे विद्यादानाचे काम केले असून त्या श्री शि. म. जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापिका आहेत. वैचारिक लेखनाच्या माध्यमातून त्या अजूनही प्रबोधनाचे काम करीत आहेत. त्यांची चार पुस्तके प्रकाशित झालेली असून विविध नियतकालिकांमधून, विशेषत: महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचे 'संक्रमण' मासिक यातून त्यांनी विपूल लेखन केले आहे. पारितोषिक प्राप्त 'कळ्यांना उमलू द्या' ही एकांकिका त्यांनी लिहिली आहे. बालचित्रवाणी, दूरचित्रवाणी आणि आकाशवाणी यांच्या अनेक कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला आहे. तसेच पुणे जिल्हा परिषद आयोजित आंतरशालेय नाट्यस्पर्धेमध्ये त्यांनी दिग्दर्शनाची अनेक पारितोषिके मिळवली आहेत. पुणे महानगरपालिकेच्या त्या दहा वर्षे सदस्या होत्या. त्याचप्रमाणे राज्य शिक्षण मंडळाच्या समन्वयक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. अनेक सामाजिक संस्थांच्या त्या संस्थापक सदस्या आहेत. साहित्य, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात तसेच रक्तदान, वृक्षारोपण अशा अनेक क्षेत्रात त्या सदैव कार्यरत आहेत. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा सत्कार श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आदी अर्पण करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर वक्ते मा. श्री. शशिकांतभाऊ सुतार आणि डॉ. सुवर्णा पाटील यांचा आणि अन्य उपस्थित सन्माननीय पाहुण्यांचा श्री. विकासराव वालावलकर यांनी शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

आपल्या परिसरातील गरजू लोकांना वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात आणून त्यांना सातत्याने सेवाभावी वृत्तीने मदत करणारे



*श्रीसहजानंदसरस्वती स्वामीमहाराज आणि भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करताना समारंभाचे अध्यक्ष प्रा. सचिनजी कानिटकर*




*अध्यक्ष प्रा. सचिनजी कानिटकर यांचे स्वागत*




*सूत्रसंचालिका सौ. शरयू यशवंतराव*

श्री. प्रवीण पेडणेकर (ल्युपिन फाउंडेशन, सिंधुदुर्ग), श्री. सचिन धुमाळ (भ. क. ल. वालावलकर रुग्णालयातील सोशल वर्कर) आणि सौ. रियाताई पवार (सिंधुदुर्ग) यांचा अध्यक्षांच्या हस्ते चांदीचा पेला आणि पुष्पगुच्छ देऊन ट्रस्टतर्फे सत्कार करण्यात आला. तसेच सातवीची परीक्षा उत्तीर्ण होऊन आपले माध्यमिक शिक्षण सुरू ठेवणाऱ्या हडकणी आणि डेरवणच्या; मधुरा चव्हाण, स्मिता गुरव, ऋतिका मोहिते, सानिका मोरे, तनुजा पवार, सानिका तटकरे, नीलेशा खाडे, मैथिली मालप, श्रेया आगरे, दीक्षा कदम आणि श्रावणी पांचाळ या मुलींना प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून मनगटी घड्याळे देण्यात आली.

माजी कृषीमंत्री, महाराष्ट्र राज्य, तसेच राज्याच्या राजकीय सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाची भर घालणारे, श्रीसहजानंदसरस्वती महाराजांचे एकनिष्ठ अनुयायी मा. श्री. शशिकांतभाऊ सुतार यांचे डेरवण येथील कार्यात अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. डेरवण येथील 'राजेवाडी धरणा'च्या निर्मितीचे ते शिल्पकारच आहेत. आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर यांचे पुण्यस्मरण करून हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या शिवजयंती उत्सवाची आठवण त्यांनी जागी केली. आजही त्याच उत्साहाने, त्याच भक्तिभावाने आणि त्याच इतमामाने हा उत्सव येथे साजरा होत आहे आणि आजही देशभरातून हजारो लोक या ठिकाणी येऊन या एकमेवाद्वितीय शिवस्मारकापासून प्रेरणा घेऊन जात आहेत याविषयी त्यांनी आनंद व्यक्त केला. ते पुढे म्हणाले,

''श्रीमहाराजांनी येथे आपले कार्य सुरू केले तेव्हा डेरवण हे एक पाचपन्नास उंबऱ्यांचे लहानसे वाडीवजा खेडे होते. येथे स्थानिकांचे सहकार्य नव्हते, आर्थिक पाठबळ नव्हते, दहशतीचे वातावरण होते. पण लोकांमध्ये आपला देश, आपला धर्म, आपली भाषा याविषयी स्वाभिमान जागृत करणे गरजेचे होते, म्हणून श्रीसहजानंदमहाराजांनी हा उत्सव सुरू केला. आजही शिवछत्रपतींची घराघरात पूजा होत असते.

''शिवछत्रपतींपासून अनेक देशभक्तांनी, क्रांतिकारकांनी स्फूर्ती घेतली. स्वा. सावरकरांनी छत्रपतींची आरती लिहिली आहे. क्रांतिकारकांचे मुकुटमणी सरदार भगतसिंगांनी रायगडावर जाऊन शिवबांच्या समाधीचे दर्शन घेतले. तेथील माती कपाळी लावून देशाला स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा केली. देशगौरव सुभाषबाबू म्हणाले, आपल्याला स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर एकच मंत्राचा जप करा– 'शिवाजी, शिवाजी आणि शिवाजी!' स्वामी विवेकानंदांनी शिवाजीमहाराजांना आपल्या देशाच्या अस्मितेचे प्रतीक म्हटले आहे.

''युगपुरुष वारंवार होत नसतात. छत्रपती युगपुरुष होते. ज्या भक्तिभावाने देशभर लोक रामायण –महाभारत वाचतात, त्या भक्तिभावाने महाराष्ट्रात शिवचरित्राचे पठण होते. राम–कृष्ण हे त्यांचे आदर्श होते. गीतेचे तत्त्वज्ञान त्यांनी अंगीकारले होते. त्यांनी कौटिल्याचा अभ्यास केला होता की नाही ते माहीत नाही पण छ. शिवाजीमहाराज हे कौटिल्याला अभिप्रेत असलेला आदर्श राजा होते. भारताच्या इतिहासात जेथे स्थानिक राजकर्त्यांना जनतेचे पाठबळ मिळाले नाही तेथे परकीय आक्रमणे यशस्वी झाली. पण शत्रू कितीही प्रबळ असला तरी आपण त्याचा पराभव करू शकतो हा आत्मविश्वास छ. शिवाजीमहाराजांनी जनतेत निर्माण केला. त्यांना जनतेचे पाठबळ मिळाले. या आत्मविश्वासाच्या बळावर मराठ्यांनी २७ वर्षे मोंगलांशी लढा दिला.

''पृथ्वीराज चौहान याने महंमद घोरीला अनेक वेळा पराभूत करूनही त्याला जिवंत सोडले. त्यानेच पुढे पृत्वीराज चौहान याला मारले. श्री शिवाजीमहाराजांनी शत्रूवर अशी दया कधीच दाखविली नाही. प्रतापराव गुजरांनी बाहलोलखानाला पराभूत केले पण जिवंत सोडले. श्री शिवछत्रपतींनी प्रतापरावाची कान उघाडणी

केली आणि सांगितले की त्याला ठार मारल्याशिवाय मला तोंड दाखवू नको. स्वराष्ट्र, स्वधर्म आणि संस्कृती यांच्या संरक्षणासाठी महाराजांनी कसलीही तडजोड केली नाही. महाराजांनी पराभवाची परंपरा नष्ट केली. विजयाची परंपरा सुरू केली. महाराजांची लढाई कोणा व्यक्ती किंवा जातीविरुद्ध नव्हती तर अन्यायाविरुद्ध होती. महाराजांनी धर्माची उभारणी केली ती प्रेमाच्या बळावर. त्यांना माणुसकी ही एकच जात ठाऊक होती. स्वराज्याच्या झेंड्याखाली उभा राहील तो स्वधर्मीय आणि मोंगलांच्या झेंड्याखाली उभा राहील तो परधर्मीय अशी साधी सोपी व्याख्या त्यांनी केली होती. काही आप्तस्वकीयांनी महाराजांशी सुलतानापेक्षा जास्त वैर धरले होते. धनदौलतीसाठी स्वराज्याशी वैर धरले. स्वार्थ हाच त्यांचा धर्म होता. महाराजांनी हिंदू धर्माची, भागवत धर्माची, महाराष्ट्र धर्माची, माणूसकीच्या धर्माची पताका जगात फडकावत ठेवली. रयतेला सुखी ठेवणे यालाच महाराज धर्म समजत होते. संतांनी पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न छ. शिवाजीमहाराजांनी प्रत्यक्षात आणले.

''डब्ल्यू. स्टिफन या ब्रिटिश विचारवंताने असे लिहिले आहे की ब्रिटिशांनी हिंदुस्थानची सत्ता अन्य कोणाकडून नव्हे तर केवळ मराठ्यांकडून आणि शिखांकडून लढून घेतली आहे.

भक्त प्रल्हादाला नरसिंहाचे दर्शन खांबात झाले. आपल्यालाही या पोलादी शिवसमर्थगडात स्वराज्याच्या नरसिंहाचे कधीतरी दर्शन होईल. हा नरसिंह आमच्या हृदयसिंहासनावर कायमचा विराजमान आहे. पिढ्यानपिढ्या तो आम्हाला प्रेरण देत आहे.''

आपले राष्ट्र, आपला धर्म यांच्या रक्षणासाठी आज आपण आपले बारीकसारीक मतभेद विसरून एकत्र आले पाहिजे. छत्रपती शिवाजीमहाराज हा केवळ बोलण्याचा विषय नाही तर तो राष्ट्रमंत्र आहे. आणि त्याचे स्मरण सतत आपणाला होत राहावे यासाठीच श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती महाराजांनी हा उत्सव सुरू केला आहे. आणि तो तसाच यापुढेही उत्साहाने समाजाला प्रेरणा देत होत राहील



*प्रा. नीलाताई कदम यांचे स्वागत*



*श्री. प्रवीण पेडणेकर यांचा सत्कार*

असा विश्वास व्यक्त करून शशिकांतभाऊंनी आपले प्रकट चिंतन संपविले.

भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी आपले विचार व्यक्त करतांना भारत देशातील स्त्रीशक्तीचे माहात्म्य काव्यमय शब्दात वर्णन करून, भाषणाला सुरुवात केली. ''हा देश स्त्रीला आदिशक्ती मानतो. ती 'अंब'(पाणी) देते म्हणून अंबा, धारण करते म्हणून धरित्री, जन्म देते म्हणून जननी, वीराला जन्म देते म्हणून वीरसू अशा विविध १६ नावांनी तिचे वर्णन केले जाते. जिच्यामुळे आम्हाला जाणता राजा मिळाला, जिच्यामुळे आम्हाला स्वराज्याचा खरा अर्थ समजला अशा जिजाऊ मातोश्री; आमच्या माताभगिनींनी आता जिजाऊ व्हायला पाहिजे आणि पुरुष बेजबाबदार वागला तर स्त्रिया त्याचे नियंत्रण करतील आणि समाजाला नाशापासून वाचवतील'' असे श्रीसहजानंदसरस्वती महाराजांचे विचार होते. पण 'मुलगी शिकली - प्रगती झाली!' किंवा 'मुलींना शिकू द्या, जगू द्या !' अशी मुलींविषयी सद्भावदर्शक वाक्ये वाचली की आपल्या समाजाची कीव करावीशी वाटते. खेडेगावातील रुग्णालयात काम करताना दिसणारी गोरगरीब स्त्रियांची केविलवाणी अवस्था त्यांनी श्रोत्यांसमोर उभी केली आणि दाहक वास्तवाची काही उदाहरणे देऊन स्त्रियांची ही परिस्थिती सुधारण्यासाठी रुग्णालयाने विविध पातळ्यांवर सुरू केलेल्या कामाची, विविध योजनांची माहिती दिली. नवविवाहितांची आरोग्य तपासणी, पौष्टिक आहार, सामुदायिक मंगळागौर, डोहाळेजेवण, सासू-सून मेळावा आदी कामाचे फलस्वरूप सांगताना, आता, प्रसूतीसाठी रुग्णालयात येण्याचे प्रमाण वाढले आहे, बालमृत्यूचे प्रमाण कमी झाले, नवजात बालकाच्या जन्माच्या वेळच्या वजनात वाढ झाली, मातेचा मृत्यूदर शून्य झाला, सामुदायिक वाढदिवसांमुळे लसीकरण पूर्ण होऊ लागले, हे नवे वास्तव त्यांनी श्रोत्यांसमोर मांडले. वालावलकर सुदामा योजना, वालावलकर यशोदा योजना यामुळे मातामुलांना पौष्टिक आहार मिळू लागला आहे.




*श्री. सचिन धुमाळ यांचा सत्कार*

किशोरवयीन मुलींसाठी सुरू असलेल्या कार्यक्रमात ५०,००० मुलींना दिलेल्या आरोग्यविषयक मदतीची माहिती डॉ. पाटील यांनी दिली. नर्सिंग आणि तत्सम अन्य कोर्सेसची माहिती देऊन संस्था तरुण मुलींना स्वावलंबी करण्यासाठी अणि आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी झटत आहे असे सांगून, संस्थेने आपल्या कर्मचारी वर्गात ७० टक्के जागा स्त्रियांना देऊन आपले सामाजिक भान स्पष्ट केले आहे हे जेव्हा त्यांनी सांगितले तेव्हा त्याला टाळ्यांच्या कडकडाटाने उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आर्थिक स्वावलंबनासाठी वेगवेगळे कोर्स, ५००० स्त्रियांचा बचत गट, आरोग्यासाठी क्रीडासंकुल आदी उपक्रमांची माहिती देऊन स्त्री सक्षमीकरणासाठी संस्था करीत असलेल्या कार्याचा आढावाच डॉ. पाटील यांनी घेतला.

स्त्रीला समाजात पुरुषाइतकाच सन्मान मिळावा, तिने मर्यादेने आणि शालीनतेने वागून सुपुत्र निर्माण करावेत आणि या राष्ट्राला सुबुद्ध आणि जबाबदार नागरिक मिळवून द्यावेत असे श्रीमहाराजांचे स्वप्न होते. समाज आचार-विचार-धर्मसंपन्न असला पाहिजे हे श्रीमहाराजांचे विचार होते. हे विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी या संस्थेची स्थापना केली आणि त्यातूनच निष्काम कर्मयोगी माणसं निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न श्रीकाकामहाराज आज पूर्ण करीत आहेत. यासाठी श्री. विकासराव वालावलकरसाहेबांनीही कंबर कसली आहे.

*''है मुझे सौगंध भारत, भूल ना एक क्षण तुझे ।*
*रक्त की हर बूंद मेरी, है तेरा अर्पण तुझे ।।*
*युद्ध ये सन्मानका है, मान रखना चाहिये ।*
*मै रहूँ या ना रहूँ, भारत ये रहना चाहिये ।।''*

या काव्यपंक्ती उद्धृत करून त्यांनी आपले भाषण संपविले.

कर्नाटकातून जेव्हा बालशिवाजी मातोश्री जिजाबाईंसमवेत पुण्यात वास्तव्यासाठी आले, त्या वेळी ज्या झांबरेपाटील यांच्या वाड्यात त्यांचे वास्तव्य होते, त्या घराण्यात माहेर असलेल्या प्रा. नीलाताई कदम यांनी प्रमुख वक्ता म्हणून या नंतर आपले विचार व्यक्त केले.

''आज माझा आवाज बसला आहे पण श्रीकाकामहाराजांनी दिलेली प्रेरणा आणि या स्थानी असलेली सकारात्मक ऊर्जा मला बोलायला बळ देईल!'' असा विश्वास भाषणाच्या प्रारंभीच व्यक्त करून प्रा. नीलाताई यांनी आपले विचार व्यक्त केले. ''निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारु । अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ।।'' या श्री रामदासस्वामींनी दि. ४ एप्रिल १६७२ रोजी छ. शिवाजीमहाराजांना लिहिलेल्या पत्रातील ओळी उद्धृत करून त्या म्हणाल्या, ''समर्थांनी शिवरायांवर अनेक गुणविशेषणे उधळलेली दिसतात. शिवकालापासून आजपर्यंत अनेक कवी, लेखक, समीक्षक, विद्वान, विचारवंत, समाजधुरंधर राज्यकर्ते, स्वकीय-परकीय आणि तुम्ही-आम्ही आम जनता छ. शिवाजीमहाराजांबद्दल बोलताना हजारो बहुमोल विशेषणे वापरतो. कारण त्यांचं चरित्र अथांग आहे, अपरिमित आहे, अगाध आहे. अफझलखानाच्या वधाचा प्रसंग सांगून त्या म्हणाल्या की महाराज कोणाशी कपटाने वागले नाहीत पण ज्यांनी कपट केले त्यांना धडा शिकविला. छ. शिवाजीमहाराजांविषयी बोलायचे म्हणजे सूर्य ओंजळीत पकडण्याचा प्रयत्न करणे होय. समर्थांनी 'नीतिवंत' हा शब्द महाराजांबद्दल वापरला. शहाजी राजांचे शौर्य आणि मातोश्री जिजाबाईंनी केलेले संस्कार यांचे स्फुल्लिंग त्यांच्या मनात होते. त्यातूनच नैतिक अधिष्ठान आणि न्यायनिवाडा करण्याची प्रबळ ताकद त्यांना लाभली होती.

''महाराजांनी १६४५ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा केली आणि नंतर काही काळातच स्त्रीवर अत्याचार करणाऱ्या रांझ्याच्या पाटलाला जबरदस्त शिक्षा केली. त्यामुळे त्या काळात स्त्रीवर्गाच्या मनात एक सुरक्षिततेची भावना निर्माण झाली. जावळीच्या दौलतराव मोऱ्यांना गादीला वारस औरस पुत्र नव्हता. दौलतरावांच्या विधवा पत्नीच्या विनंतीवरून त्यांनी दत्तक पुत्र नेमून तो प्रश्न सोडविला. पुढे तेच चंद्रराव मोरे कृतघ्न ठरले, त्यांना महाराजांनी धडा शिकविला, पण तो स्वराज्याच्या हितासाठी!




*सौ. रियाताई पवार यांचा सत्कार*




*माध्यमिक शालेय विद्यार्थिनीला उत्तेजनार्थ बक्षीस*

कोणत्याही असाहाय्य स्त्रीला आधार वाटेल असेच त्यांचे वर्तन होते. सुरतेवर हल्ला करून लूट केली, त्या वेळी मोहनलाल पारेख या सज्जन धनाढ्य, दिवंगत व्यापाऱ्याच्या कुटुंबीयांना कोणत्याही प्रकारे त्रास न देण्याची त्यांनी आपल्या सैनिकांना ताकीद दिली होती. स्त्रीचा सन्मान कसा ठेवावा हे आपल्याला शिवचरित्रातून समजते. कल्याणच्या सुभेदाराची सून महाराजांच्या सैनिकांनी पकडून आणली आणि दरबारात हजर केली हे श्रीमहाराजांना आवडले नाही. संबंधितांची कानउघाडणी करून, चोळीबांगडीचा अहेर करून त्यांनी सन्मानाने तिची परतपाठवणी केली.

''दक्षिण दिग्विजयाच्या वेळी महाराज आपले सावत्र बंधू व्यंकोजीराजे यांना भेटले. आठवडाभर ते त्यांना स्वराज्याचे महत्त्व समजावून सांगत होते. पण व्यंकोजी ते न मानता निघून गेले. हंबीररावांबरोबरच्या लढाईत त्यांचा पराभव झाला. पण महाराजांनी आपल्या या भावासाठी जिंजीजवळ सात लाखाचा मुलुख तोडून दिला; शिवाय भावजय दीपाबाई यांच्यासाठी बेंगळूर, होस्पेटे आदी भाग चोळीबांगडीसाठी दिला.

''त्यांनी युद्धे केली ती स्वत:साठी नव्हेत तर जनतेला स्वाभिमान मिळवून देण्यासाठी होती. काही वेळा एतद्देशियांविरुद्ध तलवार उपसावी लागली पण ती स्वराज्यासाठी होती. आणि म्हणूनच भवानी मातेने पाठीशी उभी राहून या तलवारीला सदैव यश दिले.

''दक्षिण मोहिमेतून परत येताना बेळगावजवळील 'बलवडी कोट' येथील भूईकोट किल्ल्याचा किल्लेदार प्रभूदेसाई या ठाणेदाराने महाराजांच्या तांड्यातील काही बैल पळविले. त्यांना सोडविण्याची कामगिरी महाराजांनी दादोजी रघुनाथ यांच्यावर सोपविली. त्या कारवाईत ठाणेदार तीन दिवसातच मारला गेला. पण त्या ठाणेदाराच्या पत्नीने सत्तावीस दिवस प्रतिकार केला. सत्ताविसाव्या दिवशी गड पडला. दुर्दैवाने सखोजी गायकवाडाने त्या स्त्रीशी काही गैरव्यवहार केला. महाराजांनी त्याला कैद करून त्याचे डोळे काढले.

''लढाईत कामी आलेल्या आपल्या सैनिकांच्या कुटुंबीयांची चरितार्थाची व्यवस्था महाराज करीत असत. डचांबरोबर मैत्रीचे संबंध झाले पण मुसलमान राजवटीप्रमाणे स्त्रीपुरुषांची गुलाम म्हणून खरेदीविक्री केल्यास ते चालणार नाही अशी तंबी त्यांनी डचांना दिली होती. मोहिमेवर सैनिकांना सोबत पत्नी, कुळंबीण अथवा कलावंतीण नेण्यास सक्त मनाई होती. परमुलुखात स्त्रियामुलांना त्रास देता कामा नये असा त्यांचा आदेश होता. त्यांच्या न्यायनिष्ठूर स्वभावातून योग्य तो बोध समाज घेत होता.

''राष्ट्रधर्माचे प्रणेते या ग्रंथाच्या प्रस्तावनेत थॉमस मेन्रो यांच्या ब्रिटिश संसदेतील एका भाषणाचा उल्लेख आढळतो. त्यात ते म्हणतात, जर सांस्कृतिक देवाणघेवाण होत असेल तर हिंदुस्थानात स्त्री जातीला जी वागणूक देण्यात येते, त्या विषयीच्या कल्पना जर उचलून धरल्या तर त्यात इंग्लंडचे हीतच आहे. महाराजांच्या स्त्रीविषयक विचारांचा प्रभाव ब्रिटिशांवर कसा पडला होता हेच यातून दिसून येते. हिरकणीने नियमभंग केला पण महाराजांनी तिच्या मातृहृदयाचा गौरवच केला. 'शिवाजीने पराभूत शत्रूचा छळ केला नाही आणि त्यांच्या स्त्रियांशीही तो आदराने वागला!' असे उद्गार औरंगझेबाने आपल्या राजपुत्रांजवळ काढले होते अशी नोंद इतिहासात आहे. लालमहालावरील छाप्यानंतर शाइस्तेखानानेही शिवाजीमहाराजांच्या चारित्र्याविषयी गौरवोद्गार काढले आहेत.

''आज समाजात सर्व क्षेत्रात स्त्रियांनी भरपूर प्रगती केली आहे. त्याचबरोबर त्यांच्यावर मोठ्या प्रमाणावर अन्याय होत आहे. पण 'शिवतेजाची ज्योत' श्रीकाकामहाराज आणि वालावलकर ट्रस्ट यांच्या माध्यमातून येथे स्त्रियांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. म्हणून समस्त स्त्रीवर्गाच्या वतीने काकामहाराज आणि ट्रस्टचे आभार मानते.''

येथील कार्याचा प्रसार संपूर्ण भारतभर व्हावा अशी इच्छा प्रकट करून शिवतेजाचा अंश तरी आपणाला प्राप्त व्हावा अशी उत्कट इच्छा व्यक्त करून त्यांनी आपले भाषण संपविले.

यानंतर समारंभाचे अध्यक्ष प्रा. सचिन कानिटकर हे अध्यक्षीय भाषणासाठी उभे राहिले. प्रारंभी आधीच्या वक्त्यांच्या विचाराचा थोडक्यात परामर्ष घेऊन त्यांनी आपले विचार व्यक्त करण्याला सुरुवात केली.

शिवाजीमहाराजांवर अनेक चित्रपट निर्माण झाले. त्यातील एक रंगीत चित्रपट मी माझ्या लहानपणी पाहिला होता. त्या चित्रपटात महाराज राज्याभिषेकासाठी सिंहासनाकडे निघालेले आहेत असे दृष्य होते.

सिंहासनारूढ होताना ते सिंहासनाची एकएक पायरी चढायला लागतात. आणि त्या त्या वेळेला हे सिंहासन निर्माण होण्याकरीता ज्यांनी त्याग केला, त्यांच्या त्यांच्या कथा त्यांच्या स्मृतिपटलावर यायला लागतात. एका पायरीवर त्यांना लढणारा तानाजी दिसतो.

एका पायरीवर बाजीप्रभू दिसतो. आणि अतिशय कृतज्ञ पावलं टाकत महाराज सिंहासनाकडे जातात असा अत्यंत अप्रतिम प्रसंग साकारलेला आहे.

आपण त्या प्रसंगात जायचे आहे आणि छत्रपतींचे स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या वीर साथिदारांची आठवण करीत आज आपण वर्तमानापर्यंत यायचे आहे असे नमूद करून ते म्हणाले,

*''भूपाल महाराष्ट्राचा दरबारी जेव्हा यावा ।*
*'जय छत्रपती शिवराय' जयघोष असा उसळावा ।।*
*सरदार शिलेदारांच्या संघात उभा असावा ।*
*दिल्लीचा दाढीवाला, गोव्याचा टोपीवाला ।।*
*मान्य तो तयासही झाला । लववितात अपुल्या माथा ।*
*एक काळ ऐसा होता ।।''*

आणि

*''सह्याद्रीतील मावळचे कडनिकडीचे झुंजार ।*
*एकेक लाख मोलाचा शिवशाहीचा सरदार ।*
*थाटला अशा वीरांनी । शिवसर्जाचा दरबार ।*
*तो दंडकमंडलू धारी । कफनीला शोभविणारी ।*
*प्रकटता समर्थ स्वारी । ध्वनी उमटे तिथे पवित्र ।*
*जयजय रघुवीर समर्थ ।।''*

या दोन्ही गोष्टींचा साक्षात्कार आपण शिवसमर्थगडात घ्यायचा आहे. हे जे कार्य उभारले आहे त्याच्या मुळाशी जायचं आहे.

''आपल्याला येथे शतपत्र कमळ दिसलं असेल, आणि त्यात ब्रह्मांड व्यापणारं कार्य जर दिसलं असेल तर त्याचं मूळ शोधायला हवं! (पुराणात कथा आहे) त्या ब्रह्म्याने क्षीरसागरात उडी घेऊन त्या कमळाची नाळ सर्वप्रथम शोधून घट्ट पकडली आणि आपण कोठून निर्माण झालो त्याचा शोध घेतला. तो शोध घेताना त्याला कोठूनही अंत लागेना! त्यालाच 'अनंत' म्हणतात. म्हणून ते पुन्हा कमळात येऊन बसले आणि चारी बाजूंना त्यांनी गोंधळून पाहिले आणि त्यांना चार तोंडे निर्माण झाली. त्यांना शब्द ऐकू आले, 'तप कर! तप कर!' ब्रह्मा ध्यानमग्न झाले आणि अंतरंगात अनंत प्रकट झाला.

''ही साधना कशी आहे? काकामहाराजांनी अनेक वेळा सांगितले आहे, योगमार्गात एकाग्रता ध्यानाने साधते. पण जेव्हा आपण परमेश्वराचे काम करीत असतो तेव्हा केलेले श्रवण आणि स्मरणसुद्धा एकाग्रता प्रदान करणारे असते, कारण ती ही साधनाच असते हे लक्षात ठेवा. मग हे अप्रतिम काम निर्माण करणे हीसुद्धा साधना आहे. येथील वीट अन वीट हे साधनेचे, तपश्चर्येचं फळ आहे. काकामहाराजांनी एकदा हे सांगितले आहे की हे उपासनेतून निर्माण झाले आहे आणि ही नित्य आचरणाची उपासना आहे. त्याला आचरण सोडून वेगळ (काही) करयची गरज नाही!



*श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण*

छ. शिवाजीमहाराजांच्या आयुष्याचा कण अन् कण, क्षण अन् क्षण, त्यांच्या रक्ताचा थेंब अन् थेंब, त्यांचं पाऊल अन् पाऊल, सगळं उपासनेसाठी वाहिलेलं होतं. ती स्वधर्मसाधना होती. आणि त्यातून हे राज्य निर्माण झालं. त्या हुतात्म्यांची आठवण आज आपण शिवजयंती साजरी करताना काढली पाहिजे.

एक शायर म्हणतो, 'जब वक्त गुलिस्तां पे पडा, तो खून हमने दिया । बहार आयी तो कहते हो, तेरा काम नही ।।' असे कृतघ्न आपण होणार नाही. वीरबाजीप्रभूचा पोवाडा लिहिताना वीर सावरकरांनी अशीच पूर्वसुरींची आठवण काढली होती.

*'चितोडगडच्या बुरुजांनो त्या जोहारासह या,*
*प्रतापसिंहा प्रथितविक्रमा या हो या समया ।*
*तानाजीच्या पराक्रमासह सिंहगडा ये ये,*
*'निगा ख्क्खो महाराज' रायगड की दौलत है आयी ।*
*जरीपटका मिरवीत धनाजी संताजी या या,*
*दिल्लीच्या तख्ताची शकले उडवीत भाऊ या ।*
*स्वतंत्रतेच्या रणास्तव मरुनी चिरंजीव झाले,*
*या ते तुम्ही राष्ट्रवीर हो, या हो या सारे ।।'*

हे रणात मरून चिरंजीव झाले म्हणजे 'मृत्युंजय' झाले. 'मृत्युंजय झाले असं का म्हणतो? प्रभू रामचंद्रांनी रावणाशी जेव्हा संघर्ष केला त्या वेळी जितके राक्षस आणि जितके वानर धारातीर्थी पडले, तितके सगळे मुक्त झाले. ज्या वेळी भगवान श्रीकृष्णांच्या साक्षीने कौरव-पांडवांचा महासंग्राम झाला, त्या महासंग्रामात जेवढे वीर धारातीर्थी पडले ते सगळे मुक्त झाले. त्याचे कारण असे आहे की ही दोन्ही युद्धे भगवंत रणांगणावर उपस्थित असताना झालेली आहेत. मग ज्या काळात शिवछत्रपती उपस्थित होते त्या काळात ज्यांनी प्राणार्पण केले ते मृत्युंजय नाहीत तर कोण? त्यांची आठवण काढीत आपण पुढे जायचे आहे.

छ. शिवाजीमहाराजांनी सोन्याचा नांगर घालून राज्यनिर्मितीची सुरुवात केली. तिथल्या झांबरे पाटील वाड्यातल्या माहेरवाशीण येथे आलेल्या आहेत. आपल्याला त्यांचे दर्शनच आनंददायी आहे.

स्वराज्यस्थापनेपासून रायगडावर महाराजांना कैलासवास झाला तेथपर्यंत किती हुतात्मे झाले याचा विचार मी करीत होतो. अनंत नावे आहेत. मला दहा नावे मिळाली. त्या दहा जणांचे अतिशय कृतज्ञतेने स्मरण करीत सिंहासनाच्या पायऱ्या चढत आपणाला पुढे जायचे आहे.



*शांतिसूक्तपठण आणि ईशस्तवन*



*मा. शशिकान्तभाऊ सुतार -*
*'छ. शिवाजी महाराजांनी विजयाची परंपरा सुरू केली !'*



*डॉ. सुवर्णा पाटील - 'संस्थेने आपल्या कर्मचारी वर्गात ७० टक्के जागा स्त्रियांना देऊन आपले सामाजिक भान स्पष्ट केले आहे'*

पहिला हुतात्मा झाला आहे तो स्वराज्यावरील पहिल्या स्वारीच्या वेळेला. फत्तेखानाची स्वारी आली होती. प्रथमपासूनच शिवाजीमहाराजांची एक अप्रतिम रणनिती आखलेली होती की स्वराज्यात शत्रूला घुसू द्यायचे नाही. मग सिंहगड, कुवारीगड असं स्वराज्य होतं. तोरणा पहिला किल्ला. त्याच्या शेजारी राजगड. शिवाजीमहाराजांनी आत्ताचा हायवे असलेला भाग ओलांडला, पुरंदर किल्ला घेतला आणि पुरंदरावर फत्तेखानाशी संग्राम मांडला. त्याच्याबरोबर मताजी घाटगे, हैबतराव, निंबाळकर, मोसेखान असे सरदार होते. ते गड चढून येत असताना नेताजी पालकर वरून दगड धोंडे टाकीत होते. प्रचंड रणधुमाळी माजली आणि त्यांची माघार सुरू झाल्यावर त्यांच्या अंगावर कोसळण्यासाठी शिवाजीमहाराजांनी एक सैन्य तयार ठेवलं होतं. त्या सैन्यात त्यांचा पांढऱ्या मिशांचा बाजी पासलकर हा एक बालमित्र होता. मोसे खोऱ्याचे वतनदार देशमुख आणि सहासष्ट वय! त्या सैन्याने पुरंदरपासून सासवडपर्यंत फत्तेखानाच्या सैन्याला मागे रेटले! त्यामागची सगळी प्रेरणा हाती तलवार घेऊन मैदानात उतरलेल्या बाजी पासलकरांची! ते कान्होजी जेध्यांचे सासरे! कान्होजी त्या वेळी शहाजीराजांसोबत कनकगिरी किल्ल्यात कैदेत होते. सर्व देशमुख महाराजांना मानत नव्हते. ते आदिलशाहीचे चाकर होते. सासवडपर्यंत लढाई गेली. एक घाव वर्मी बसला आणि बाजी पासलकर धारातीर्थी पडले. शिवाजीमहाराजांसाठी हुतात्मा झालेला पहिला वीर ज्येष्ठ नागरिक होता! आणि ज्येष्ठ नागरिकांनी पाठिंबा कृतिशील द्यायचा असतो, पोकळ नव्हे!

आम्ही सांगलीच्या मंडळींनी 'मराठ्यांची संग्रामगीते' हे पुस्तक श्रीकाकांच्या प्रेरणेने काढले होते. त्याच्या प्रती जेव्हा आम्ही येथे आणल्या तेव्हा त्याचे पैसे रोख आम्हाला देण्यात आले आणि त्या वेळी श्रीकाका म्हणाले की हिंदूंची कोणतीही गोष्ट येथे फुकट घेतली जात नाही. त्या वेळी ते म्हणाले, तुमची अशी मंडळे टिकली तरच अशी स्थाने टिकणार आहेत. बाजी पासलकरांचा हाच संदेश आहे की ज्याला जे जमेल त्यानिशी त्याने अशा मंडळांच्या पाठीशी उभे राहावे. मी वृद्ध असेन पण मी मंडळाचे हिशेब लिहू शकेन! हेही स्वराज्यसेवेतले योगदान आहे! 'सूरज ना बन पाये तो बनके दीपक जलता चल ।'

आता दुसरी पायरी. शिवाजीमहाराजांनी अफझलखानाचा वध केला. प्रचंड रणसंग्राम झाला. महाराज विजयी झाले पण विजयात रमले नाहीत. त्या मध्यरात्रीच महाराजांनी पुढील स्वारी सुरू केली. अफझलखानाच्या मृत्यूच्या बातमीपाठोपाठ महाराजांचे सैन्य निघाले. विश्रांती नाही! महाराज पन्हाळगडावर आले. सिद्धीजोहार प्रचंड सैन्यानिशी चालून आला. त्या वेळी महाराज मिरजेच्या वेढ्यावर नेताजी पालकरला मदत करीत होते. बातमी समजताच ते सुरक्षिततेसाठी पन्हाळगडावर जाऊन राहिले. पाडव्याचा दिवस होता. चार महिने महाराज तेथेच अडकून पडले. आजूबाजूच्या भागात अनेक स्वराज्यप्रेमी वास्तव्य करून होते. त्यातीलच एक, पन्हाळ्याजवळील नेवापूर गावचा शिवा काशीद असाच महाराजांच्या स्वराज्यात त्यांच्या चाकरीत सामील झाला.

आषाढ पौर्णिमेच्या दिवशी महाराजांनी शत्रूला हुलकावणी देण्यासाठी गंगाधरपंतांना तहाचा पांढरा झेंडा घेऊन खाली पाठविले. शत्रू बेसावध झाला आणि रात्री महाराज बाजीप्रभू देशपांडे यांच्या सहाशे सैनिकांसमवेत वेढ्यातून निसटून निघाले. महाराजांसारखे कपडे करून शिवा काशीद महाराजांच्या पालखीत बसून निघाला. महाराज आडवाटेने निघून गेले आणि मराठ्यांनी पाठलाग करणाऱ्या सिद्धी मसूदला हुलकावणी दिली. मोगल सैन्याने पालखी पकडली. शिवा काशीदची खांडोळी करण्यात आली. पण मरताना शिवा स्वराज्याच्या कामी आल्याच्या समाधानाने मेला. शिवाचा संदेश



*प्रा. नीलाताई कदम – 'छ. शिवाजीमहाराजांनी युद्धे केली ती स्वत:साठी नव्हेत तर जनतेला स्वाभिमान मिळवून देण्यासाठी!'*




*प्रा. सचिनजी कानिटकर – ''भूपाल महाराष्ट्राचा दरबारी जेव्हा यावा । 'जय छत्रपती शिवराय' जयघोष असा उसळावा ।।''*

काय आहे? मरण हे अपरिहार्य आहे तर असे काहीतरी भव्यदिव्य साहस करून प्रानार्पण करा की ज्याने सगळेमायुष्यच उजळून निघेल!

पन्हाळ्याहून निघालेले महाराज पांढरपाणी गावाजवळील गजापूर खिंडीजवळ उजाडता आले. सावध झालेल्या मोंगलांनी पाठलाग सुरू ठेवला होता. मागे घोड्यांच्या टापांचा आवाज येऊ लागला. विशाळगड नक्की कोणाच्या ताब्यात आहे हे माहीत नाही! बाजी प्रभू म्हणाले, ''महाराज, आपण तीनशे मावळे घेऊन गडावर जावे. तीनशे मावळ्यांनिशी मी येथे शत्रूला अडवितो.'' महाराज म्हणाले की मीही येथेच थांबणार! महाराज रण सोडणारे नव्हते. अफझलखानाला ते स्वत: भिडले होते. पुण्यात शाइस्तेखानाच्या सेनासागरात ते स्वत: घुसलेले आहेत. त्यामुळे ते पुढे होतात हे सर्वांना माहीत आहे. आणि म्हणूनच हा देवदुर्लभ राजा रक्षायचा आहे म्हणून बाजी प्रभू पुढे आलेत! बाजी प्रभूंनी वडिलकीच्या अधिकाराने शपथ घातली आणि महाराजांना पुढे पाठविले. लढता लढता बाजी प्रभूंची ''होय तनुची केवळ चाळण । प्राण उडाया बघती त्यातून । मिटण्या झाले अधीर लोचन । बोलवशील का आता घरी । सरणार कधी आता रण ।'' अशी अवस्था झाली. गडावर मोगलांशी एकनिष्ठ सूर्यराव सुर्वे आणि जसवंतराव पालवणीकरांचे वेढे होते. ते तोडून महाराजांना जावे लागले.

इकडे पावनखिंडीत बाजी भयंकर जखमी झाले आहेत. तोफांचे आवाज ऐकल्याशिवाय बाजी प्राण सोडायला तयार नाहीत. तोफांचे आवाज होत नाहीत! ज्या क्षणी तोफांचे आवाज झाले त्या क्षणी बाजी प्रभूंनी प्राण सोडला!

आमच्या एका बॉक्सरने ऑलिम्पिकमध्ये हातातोंडाशी आलेले कांस्यपदक शेवटच्या क्षणी गाफिल राहिल्यामुळे गमावले होते. त्यांने बाजी प्रभूंचा संदेश ऐकला नव्हता, 'भांड्यांचे आवाज ऐकल्याशिवाय युद्ध सोडायचे नाही!'' आपल्या आयुष्यात असे अनेक प्रसंग येतात. परीक्षेच्या वेळी पेपर वेळ संपायच्या आधी टाकू नये. आपणाला आणखी काही आठवू शकते, काही आणखी सुचू शकते! सख्ख्या भावासह रणांगणावर देह ठेवणाऱ्या बाजी प्रभूंचा हा संदेश विसरू नका!

पुढच्या पायरीवर स्मरू या, मुरारबाजी देशपांडे! जयसिंहाचे आक्रमण आलेले आहे. सोबत दिलेरखान! औरंगझेबाने मामा शाइस्तेखानाची बोटे महाराजांनी तोडली म्हणून संतापाने यांना पाठविले आहे. एकदा हा वरवंटा स्वराज्यावरून फिरला की विषय संपला! या आक्रमणाला तोंड देण्याएवढी महाराजांची तयारी नाही! पण आपण शरण गेलो तर हे आपणाला शिल्लक ठेवणार नाहीत हे महाराजांना पक्के माहीत आहे. मात्र महाराजांनी दिलेरखानाला पत्राद्वारे धाक दाखवणे सुरू केले. जेव्हा दिलेरखान पहिला मोर्चा पुरंदरावर लावायला लागला तेव्हा पुरंदरावर महाराजांनी अप्रतिम दांडपट्टा खेळणारा शूर मुरारबाजी याला पाठविले. गड सोडायचा नाही अशी महाराजांची आज्ञा होती. लढाई सुरू होती. शेवटी दिलेरखानाने 'सुलतान ढवा' म्हणजे सर्वशक्तिनिशी हल्ला सुरू केला. आजूबाजूच्या डोंगरांवरसुद्धा तोफा चढविल्या. त्यांने महाराजांच्या पत्राला उत्तर देताना लढवय्यासारखे मैदानात समोरासमोर येण्याचे आव्हान दिले होते. केवळ सातशे सैनिकांसह मुरारबाजी मैदानात उतरले आणि अशी घनघोर लढाई केली की दिलेरखान शत्रुत्व विसरून आश्चर्यचकित झाला. 'ये कैसा सिपाही खुदाने बनाया है । असे उद्गार त्याने काढले. जहागिरी देण्याची लालूच दाखवून त्याला आपल्या पक्षाला येऊन मिळण्याचे आवाहन केले. 'मुलुख कोणाचा आणि देतोय कोण?' असे म्हणून मुरारबाजी अधिकच त्वेषाने लढू लागले. त्यांचे शीर बाणाने उडवले तरी त्यांचे धड त्वेषाने लढत होते असे म्हणतात! महाराजांप्रती निष्ठा अशी अंगात, कणाकणात

मुरली होती, त्या आवेगात धड लढत राहिले! अशी निष्ठा आपल्या कणाकणात भिनली पाहिजे हा मुरारबाजींचा संदेश आहे.

शिवाजीमहाराज बालपणी जिजाऊंसमवेत राहात होते त्या खेडबारे वतनातील त्यांच्या वाड्याशेजारी नऱ्हेकर देशपांडे यांचा वाडा होता. बापुजी मुद्गल देशपांडे नऱ्हेकर. त्यांना बाळाजी बापुजी, चिमणाजी बापुजी आणि नारोजी बापुजी असे तीन मुलगे. त्यातील नारोजी हा १६६५च्या दरम्यान म्हणजे मिर्झाराजे जयसिंग यांच्या स्वारीच्या काळात हुतात्मा झाला आहे. कविंद्र परमानंदांनी शिवभारतात त्याचा उल्लेख केलेला आहे. तानाजी आदी मोठमोठे सरदार लढत असताना नारोजी 'द्विज' हा पंचहजारी सरदार तेथे लढत होता असा उल्लेख आहे. यातील बाळाजी आणि चिमणाजी शिवाजीमहाराजांसमवेत लालमहालात घुसले होते. लहानपणी ते महाराजांबरोबर खेळले होते. त्यामुळे लालमहालाविषयी ते जाणकार होते. महाराज जयसिंगाच्या तहानंतर आग्र्याला जाऊन आले आणि गेलेले किल्ले पुन्हा परत मिळविण्याची मोहीम सुरू झाली तेव्हा, सत्तराव्या वर्षी निळोपंत मुझुमदारांनी पुरंदर घेतो म्हणून महाराजांना सांगितले होते. त्या लढाईत या नारो बापुजीचा मुलगा केशव नारोजी हा मारला गेला. किल्ला फते झाला हा निरोप मुरारबाजीकडे सांगायला हा केशव नारोजी जणू स्वत: देह सोडून गेला. या गोष्टीचा संदेश काय?

यामागे एक कहाणी आहे. भिकाजी रुद्र देशपांडे या त्यांच्या भावाबरोबर खेडबाग्राच्या वतनावरून महाराजांच्या दरबारी एक दावा सुरू होता. आमचे वतन या नारो बापुजी देशपांड्यांनी लाटलं आहे असे त्यांचे म्हणणे होते. हे नारो बापुजी देशपांडे महाराजांचे जवळचे सेवक मोरोपंत, तसेच त्र्यंबकजी डबीर आदींचे जवळचे नातेवाईक होते. त्यामुळे सखोजी भिकाजींचे म्हणणे असे होते की त्यामुळे या दाव्याचा निकाल त्यांच्या विरुद्ध गेला आहे आणि त्यांना महाराजांच्या दरबारी न्याय मिळत नाही. सरतेशेवटी निळोपंत मुजुमदार यांनी न्याय केला आणि भिकाजी रुद्राजीच्या बाजूने न्याय देऊन ते वतन त्यांना द्यायला लावले. हा खटला नारो बापुजींकडून केशव नारोकडे चालत आला आणि भिकाजी रुद्राकडून त्याचा मुलगा सखो याच्याकडे आला आहे.

यात सांगायचा मुद्दा असा केशव नारोने केवळ वडिलोपार्जित संपत्तीचा नव्हे तर वडिलांच्या शौर्याचा, प्राणांतिक त्यागाचा वारसाही पुढे चालवला. वारसा केवळ पूर्वजांचे वतन किंवा इस्टेट भोगाण्यासाठी नाही तर त्यांच्या त्यागाचाही घ्यायचा! ज्या



*वरयाचना*



निळोपंतांनी हा निवाडा केला त्यांच्या हाताखाली लढताना हा केशव नारो मारला गेला आहे!

पुढची कहाणी आहे तानाजी मालुसरे यांची. आपण ती लहानपणापासून ऐकत आलो.

''घोरपडीला दोर लावूनी पहाड दुर्घट चढलेले । तुटुन पडता मस्तक खाली धुंद धडाने लढलेले ।

खंदकातल्या अंगारावर हासत खेळत पडलेले । बाप असे कळीकाळ आमुचा कीर्त गाजली दिगंतरी । रणफंदींची जात आमुची कोण आम्हा भयभीत करी ।। ''

हा रुबाब तानाजीचा! घरात लग्न म्हणून आमंत्रणाला आलेत महाराजांकडे! सिंहगड परत जिंकून घ्यायचा ही महाराजांची आणि मातोश्री जिजाबाईंची उत्कट इच्छा. त्याविषयी विचारविनिमय सुरू असता तेथे तानाजी आले. महाराज म्हणाले की तुझीच आठवण काढीत होतो. 'कशाकरता?'' महाराज म्हणाले, ''सिंहगड घ्यायचा आहे.'' तानाजी म्हणाले, ''हा आत्ता निघालो!'' जिजाऊ म्हणाल्या, 'तो उमरठहून आलाय, कशाकरिता आलाय ते तरी विचार!'' आणि तेवढ्यात राणीवशातून निरोप येतो की तानाजीसोबत त्यांची पत्नीही आली आहे आणि ते रायबाच्या लग्नाची अक्षत घेऊन आले आहेत. ते ऐकून महाराज म्हणतात, ''रायबाचं लग्न म्हणजे आमच्या पुतण्याचं लग्न. चला थाटात लग्नाचा बार उडवू!'' तेव्हा तानाजी म्हणतात, ''नाही महाराज! आधी लगीन कोंढाण्याचं आणि मग रायबाचं !'' मुलाचे लग्न बाजूला ठेऊन जिथून परत येऊ अशी खात्री नाही अशा लढाईवर जाणे म्हणजे काय आहे? देशासाठी सर्वस्वावर लाथ मारणे म्हणजे काय आहे? जसवंतसिंगाला जो अवघड किल्ला घेण्यासाठी सहा महिने लागले होते तो किल्ला तानाजीने एका रात्रीत घेतला! कसा घेतला? अवघड जागी पहारे नसतात म्हणून सगळ्यात पश्चिमेकडच्या डोणागिरीच्या कड्यावरून चढाई केली घोरपड वगैरे वापरून!

यात संदेश असा आहे की आयुष्यात येणारा प्रसंग कितीही अवघड असो, त्याला एक ना एक डोणागिरीचा कडा असतो. त्यावरून चढाई करायची, यश हमखास मिळेल! 'करविती गुरू तें तें असे होत ।' वाचा. तुम्हाला समजेल की या मंडळींनीही संकटांवर कशी मात केली आहे!

आता पुढचा हुतात्मा! आग्र्याहून सुखरूप आल्यावर महाराज पुन्हा आपले किल्ले परत घेऊ लागले तेव्हा मोगलांनी दिलेरखान आणि बहादूरखान यांचे प्रचंड सैन्य महाराजांवर पाठविले.

बहादूरखान हा औरंगजेबाचा दूधभाऊ दक्षिणेचा सुभेदार होता आणि तो लाखभर सैन्य घेऊन आला आणि सोबत दिलेरखान! तोही पहिल्यापासून शौर्याने लढत होता. दिलेरखानाने साल्हेरगडाला वेढा घातला होता आणि तो त्यातील थोडी फौज घेऊन कण्हेरगडावर गेला. हा हजार-बाराशे शिबंदीचा लहानसा किल्ला आणि त्याची किल्लेदारी रामजी पांगेऱ्यावर आहे. हा रामजी अफझलखानाच्या वेढ्यापासून महाराजांसह लढतोय!

त्या वेळी मोरोपंत कोकणात 'कोळवण' येथे तर प्रतापराव गुजर 'वऱ्हाड खानदेशा'त गेले होते. बाहेरून मदत येण्याची शक्यता नाही. परिस्थिती अशी आली की आता हा किल्ला आपण राखू शकत नाही. आता किल्ला शरणागती पत्करून द्यायचा की लढून? पांगेरा जाणतो की त्याच्या शिरावर महाराजांची इभ्रत आहे. तेव्हा शीर झुकता कामा नये! पांगेऱ्याने आपल्या सैनिकांना एकत्र गोळा केले आणि म्हणाला, "आपल्याला आता 'निदान' करायचे आहे!" निदान म्हणजे शेवटची लढाई! "कोण तयार आहे?" सर्वांनी हात वर केले! रामजीने आपले मुंडासे काढून आनंदाने हवेत भिरकावले, सगळ्यांनी आपापली मुंडाशी हवेत भिरकावली. रामजीने आपला अंगरखा काढून फेकला, सगळ्यांनी आपले अंगरखे काढून फेकले आणि तलवारी उपसून सगळे निघाले! सभासदांनी अशी उपमा दिली आहे की हलगीवर जशी टिपरी वाजत असते तसे 'काड् काड्' युद्ध झाले. या सहाशे जणांनी दिलेरखानाचे बाराशे सैनिक कापले. एकाएकाच्या अंगावर वीसतीस जखमा झाल्या! रामजी पांगेरा सहाशे वीरांसह हुतात्मा झाला. काय संदेश आहे याचा? 'निदानी'ची वेळ येते तेव्हा मृत्यू स्वीकारावा, अपमान सहन करू नये!

शिवाजीमहाराजांनी मोरोपंत आणि प्रतापरावांना साल्हेरगडाकडे बोलावले. या दोघांचे चाळीस हजार आणि दिलेरखानाचे साठ हजार असा एक लाखाचा संग्राम तेथे होणार होता. मोठं आव्हान होतं! आजपर्यंत महाराजांना 'पहाड का चुहा' म्हणून हिणवलं जायचं. आज साठ हजार कसलेल्या सैन्याला चाळीस हजाराचं मराठा सैन्य उत्तर देणार होतं! त्याची आखणी अशी केली. एक तुकडी प्रतापरावांच्या नेतृत्वाखाली मुल्हेरकडे गेली. एक तुकडी मधल्या वाटेवर लपविण्यात आली. मोरोपंतांसमवेत एक पायदळाची आणि एक घोडदळाची तुकडी आहे. मोठा शत्रू एकत्र न येता त्याला विभागला पाहिजे! पहिला हल्ला प्रतापरावांनी केला. काही वेळ लढाई झाल्यावर प्रतापरावाचे सैन्य हुलकावणी देऊन मुल्हेरच्या दिशेने पळायला लागले आणि नेहमीप्रमाणे मराठे पळून जात आहेत असे वाटून मोगल सैन्य त्यांच्या मागे लागले! मोगलांचे घोडदळ प्रतापरावांच्या मागून गेल्याबरोबर मोरोपंतांनी लढाई सुरू केली. ते पायदळाला मार देऊ लागले. काही अंतर दौड केल्यावर प्रतापरावाने उलटून पुन्हा मोगलांशी लढाई सुरू केली. त्यांच्या घोडदळाला बडवायला सुरुवात केली. ते घोडदळ परत मागे पळू लागले तेव्हा मधे लपवून ठेवलेल्या राखीव तुकडीने त्यांच्यावर हल्ला केला. शिवाय मोरोपंतांचे राखीव घोडदळही मैदानात उतरले आणि 'न भुतो न भविष्यति' असा मोगलांचा पराभव झाला. साठ हजारातले फक्त पाच ते दहा हजार सडेसडे पळून जाण्यात यशस्वी झाले. 'बावीस हजार पडले. रक्तमांसाचा कर्दमो जाहला. तीन कोस औरस चौरस धुरळा आकाशात उडाला होता तो खाली बसायचं नावच घेत नव्हता' असे वर्णन सभासद बखरीत आहे. महाराजांचा एक वीर या लढाईत गेला. त्याचे नाव सूर्यराव काकडे. सभासद वर्णन करताना म्हणतात, महाराजांचा सवंगडी गेला, तो 'कर्णाच्या प्रतिमे'चा योद्धा होता. 'महाभारती जैसा कर्ण तैसा सूर्यराव पडला.' या सूर्यरावांचे नाव आपण कधी इतिहासात वाचले नाही. ते मोठ्या सेनापतीच्या हुद्यावर नव्हते. त्यांनी आपले व्यक्तिमत्त्व महाराजांच्या पायी मिसळून टाकले होते. 'आपला अहंकार बाजूला ठेऊन स्वराज्यासाठी ही सेवा आपण करतो आहोत!' हे अंत:करणात बिंबवून स्वराज्याच्या कामी उतरायचे आहे, हा सूर्यरावांचा संदेश आहे !

आणि आता प्रतापरावांची कहाणी.

*'म्यानातून उसळे तरवारीची पात ।*
*वेडात दौडले वीर मराठे सात ।'*

काय आहे ती कहाणी? राज्याभिषेकाची वेळ जवळ आली होती आणि आदिलशहाकडे अब्दुल करीम बेहलोलखान हा एकच मोठा सरदार उरला होता. बेहलोलखान प्रतिअफझलखान होता. तो स्वराज्यात घुसण्याच्या प्रयत्नात होता. त्याचा बंदोबस्त करण्याची कामगिरी महाराजांनी प्रतापरावांवर सोपविली. हे का सांगितले? तर सीमेवर नागरिक त्रास सहन करीत आहेत आणि अशा वेळी आपण राज्याभिषेक करून घेणे हे महाराजांना पटणारे नव्हते. हिंदू हे गुलाम आहेत. ते कधी राजे होऊ शकत नाहीत हे मुसलमान राजकर्त्यांचे म्हणणे खोडून काढण्यासाठी महाराज 'हिंदू राजा' म्हणून राज्याभिषेक करून घेत होते. येथे राम राजा होता, कृष्ण राजा होता, युधिष्ठीर राजा होता. आम्ही पूर्वापार येथील राजे आहोत हे महाराजांना दाखवायचे होते. ज्याला आपण शिवशक म्हणतो, त्याला महाराजांनी 'राज्याभिषेक शक' असे नाव दिले आहे. स्वत:चे नाव दिलेले नाही!

म्हणून प्रतापरावाला महाराजांनी मोहिमेवर पाठवला. प्रतापरावांनी सांगली जिल्ह्यात उमराणीपाशी डोण नदीचे पाणी अडवून धरले. युद्ध झाले तेव्हा बेहलोलखानाचे सैन्य पाण्यासाठी व्याकूळ झाले, कारण प्रतापरावांनी त्यांचे पाणीच अडवून धरले होते. बेहलोलखानाने पाणी चाखले ते प्रतापरावांच्या तलवारीचे. बेहलोलखान शरण आला. प्रतापरावांनी त्याला क्षमा केली. महाराज ती बातमी ऐकून



*मिरवणुकीतील क्षणचित्र*

संतापले. ''बेहलोलखानास गर्दीस मिळवणे आणि मगच आम्हास तोंड दाखवणे'' असे महाराजांनी त्याला लिहिले. हे प्रतापरावांच्या जिव्हारी लागले. ते सीमेवरच फिरत राहिले. त्यांनी हुबळीला जाऊन इंग्रजांची वखार पुरुषभर खणून लुटली. आणि ते गडहिंग्लजपाशी 'सामनगड' नावाचा किल्ला आहे तेथे मुक्कामाला असताना त्यांना समजले की बेहलोलखान परत चालून येत आहे. महाशिवरात्रीचा दिवस होता. सकाळी हे रपेटीला बाहेर पडले तेव्हा बरोबर सहा जण होते. तेवढ्यात खबऱ्याने बेहलोलखान आल्याची बातमी आणली. प्रतापराव आवेगाने तेथूनच बेहलोलखानाच्या दिशेने निघाले. सोबतचे सहाही जण त्यांना साथ द्यायला धावले. बेहलोलखानाने त्यांना पाहिले. त्यांच्या पगडीवरून त्यांना ओळखले. सैनिकांना 'कत्ले आम करो' म्हणून आज्ञा केली.

*'खालून आग वर आग आग बाजूनी ।*
*समशेर उसळली सहस्र क्रूर इमानी ।*
*गर्दीत लोपले वीर सात ते मानी ।*
*अद्याप विराणी कुणी वाऱ्यावर गात ।*
*वेडात दौडले वीर मराठे सात । '*

प्रतापराव आणि सहा वीर 'मृत्युंजय' झाले. हे कशाचे वेड? रायगडावर राज्याभिषेक होतोय, सगळेच हिंदवी स्वराज्य स्थापन झाले या आनंदात आहेत, सुखात आहेत आणि त्या आनंदात, त्या सुखात मला सहभागी होता येत नाही हे वेड प्रतापरावांच्या डोक्यात होते. प्रतापरावांचा संदेश हाच की आततायीपणा करून मुळातच डाव बिघडू देऊ नका, त्याने कार्यनाशच होतो.

ही घटना शिवाजीमहाराजांनी मनाला लावून घेतली आणि प्रतापरावांची मुलगी आपली सून करून घेतली. राजाराममहाराजांशी तिचे लग्न लावून दिले. महाराज अतिशय कृतज्ञ होते.

आता शेवटचा हुतात्मा. राज्याभिषेकानंतर दक्षिण दिग्विजयासाठी स्वारी निघाली आहे. आणि कोप्पळचा किल्ला घेण्याची हंबीररावांना आज्ञा होते. हंबीरराव तरुण सरदारांना घेऊन निघतात. राजे त्या वेळी आंध्र प्रदेशात निघाले होते. त्या वेळेला हुसेनखान मियाना नावाचा पठाण सरदार हत्तीवरून दिलेरखानासारखाच आला. त्याला वेढून हाणामारी चाललेली. पहिल्याने हंबीररावांनी 'पळा' म्हणूनच सांगितले, तेव्हा धनाजी, संताजी सारखी तरणी पोरं वैतागली पण सेनापतीची आज्ञा म्हणून पळू लागले. तो पठाण जोमाने पुढे आला

आणि अचानक हंबीररावांनी उलटून लढायची आज्ञा केली. पठाणाला वेढा दिला गेला. आणि हंबीररावांचे पथक केसात भांग पाडावा तसे आत घुसले. एका तरण्याबांड मराठा वीराने हुसेनखानाच्या हत्तीवर हल्ला करून भाला फेकला, तो माहुताला लागला. हुसेनखान वाचला. हुसेनखानाने मारलेल्या बाणाने तो वीर मात्र मरण पावला. नागोजी जेधे त्याचे नाव! कान्होजी जेध्यांचा १६–१७ वर्षांचा नातू. बाजी सर्जेराव जेध्यांचा मुलगा. बाजी पासलकरांचा पणतू. हा ज्ञात असलेला शेवटचा हुतात्मा.

या लोकांनी पिढ्यान्‌पिढ्या चाकरी केली स्वराज्याची. ऐषाराम नाही! बाजी सर्जेरावही त्या रणात लढत होते. नागोजीराव हुतात्मा झाले. शिवाजीमहाराज कारीला त्यांच्या वाड्यावर स्मृतिदिनाला दरवर्षी एक शेर सोनं पाठवायचे!

या सगळ्यातून आपण काय शिकायचे? आपल्या अध्यात्मात एक संदेश दिला जातो. ‘पिंडी ते ब्रह्मांडी’ आणि ‘ब्रह्माडी ते पिंडी’ सुद्धा असते. राम, कृष्ण, शिवाजीमहाराज यांचे कार्य आपण पाहिले. येथील कार्यही आपण पाहिले. जगजीतसिंग यांनी गायिलेला नीदा फजली यांचा एक दोहा आहे. ‘छोटा करके देखिये जीवन का विस्तार । आँखोभर आकाश है बाहोंभर संसार ।’ जग छोटे करायचे झाले तर तुमच्या डोळ्यांनी दिसते तेवढेच आणि बाहूंमध्ये सामावेल एवढेच ते आहे.

खरेतर या कार्यात आपल्याला सहभाग मिळणे हेच भाग्याचे आहे. येथे श्रवणाचासुद्धा आनंदच आहे, बोलण्याचाही आनंदच आहे, खुर्च्या लावण्याचा, सतरंज्या घालण्याचा, मंत्र म्हणण्याचा आनंदच आहे. येथे शिकण्याचासुद्धा आनंद आहे, कारण हे स्थान जगावेगळं आहे. लहान मुलांना मी एक कविता म्हणायला सांगतो –

*‘मोठा होणार मी मोठा होणार ।*
*रामचंद्र नाही जमले तर वानरसेनेतले वानर होणार ।।’*

राम एखादाच होतो, पण वानर बनायला काही अडचण आहे का? रावणाच्या सैन्यात कुंभकर्णासारखा सेनापती बनण्यापेक्षा रामाच्या सेनेत वानर का बनू नये?

*‘कृष्णकरंगळी नाही जमली तर एका गोपाची काठी होणार ।*
*राजा शिवाजी नाही जमलं तर त्याच्या सैन्यातला मावळा होणार ।*
*वानर, मावळे, गोप सारी मोठेपणाची खूणच न्यारी ।*
*चोराचोरीच्या श्रीमंतीला, भ्रष्टपणाच्या मोठेपणाला,*
*कवडी किंमत नाही देणार ।*
*मोठा होणार मी मोठा होणार ।’*

आपण प्रतिवर्षी शिवजयंतीला येथे येऊन हा मोठा होण्याचा संदेश घेऊन जात असतो आणि याच कामासाठी पुन्हापुन्हा येत असतो. हे भाग्य चिरंतन आमच्या भाळी लिहिले जावे हीच सद्गुरूंच्या चरणी प्रार्थना करतो.’’




*मिरवणुकीतील क्षणचित्र*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

त्यानंतर श्री. विवेक सरस्वते यांनी आभारप्रदर्शन केल्यावर वरयाचना होऊन सभेची सांगता झाली. सायंकाळी साडेसहा वाजता क्रीडासंकुलापासून शिवसमर्थगडापर्यंत श्रीशिव छत्रपतींची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या नेत्रदीपक मिरवणुकीची सांगता रात्रौ दहा वाजता शिवसमर्थगडात झाली.



*मिरवणुकीतील क्षणचित्र*

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे–३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील–९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव–९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर–९५८८४ ७९२२०